**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.278, www.srjis.com**
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, FEB-MAR, 2023, VOL-11/56

# बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ संदर्भात पुणे शहरातील मराठी माध्यमांच्या शाळांनी केलेल्या अंमलबजावणीचा अभ्यास

**सौ. तिखे निलिमा नारायण[१] , Ph.D. & सौ. नीता यशवंत चिंचोलीकर[२]**

*[१]सुभाषअण्णा कुल ऑफ एज्युकेशन, मधुकर नगर, पाटस, ता. दौंड, जि. पुणे.*

*[२]सहशिक्षिका, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाची, जिजामाता प्राथमिक शाळा, खडकी, पुणे ३.*

**Paper Received On:** 18 MAR 2023

**Peer Reviewed On:** 31 MAR 2023

**Published On:** 1 APRIL 2023

***Abstract***

*''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' हा कायदा संपूर्ण देशभर (जम्मू आणि काश्मीर वगळून) दि. १ एप्रिल २०१० पासून लागू झाला. ८६ व्या घटना दुरूस्तीनुसार राज्य घटनेमध्ये २१ (क) या शिक्षण हक्क कलमांचा समावेश करण्यात आला. या अधिनियमांच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ ही नियमावली तयार केली. या अधिनियमात केंद्रशासन, राज्यशासन, स्थानिक, प्राधिकरण शाळा व्यवस्थापन समिती, पालक, शिक्षक व मुख्याध्यापक इ. घटकांच्या जबाबदाऱ्या नमूद करण्यात आल्या. या सर्वांनी आपापल्या जबाबदाऱ्या कोणत्या आहेत? याची माहिती घेतली व कायद्यांचा अभ्यास करून अमंलबजावणीस सुरूवात केली.*

***मुख्य संकल्पना :*** *बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ अंमलबजावणीचा अभ्यास.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:**

''बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' या कायद्याचा समग्र विचार केल्यानंतर त्यात अनेक मुद्यांचा समावेश आहे. या क्षेत्रात काम करणारे विद्यार्थी, शिक्षक, पालक व शिक्षण विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या नेहमी दैनंदिन कामाशी निगडीत असणाऱ्या मुद्यांविषयी परिचित स्वरूपात हा कायदा त्यांच्यासमोर आल्यावर त्यांनी त्याची अमंलबजावणी कशी केली ? आणि या कायद्यांमुळे काही बंधने निर्माण झाली आहेत का ? ती यशस्वीपणे पूर्ण होण्यासाठी शाळांनी या कायद्यांची अमंलबजावणी करण्यासाठी कोणते परिवर्तन घडवून आणले ? हे समजण्यासाठी या विषयावर संशोधन केले आहे.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**शिर्षक:**

''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' संदर्भात पुणे शहरातील मराठी माध्यमांच्या शाळांनी केलेल्या अमंलबजावणीचा अभ्यास.

**संशोधन समस्येचे विधान :**

पुणे शहरातील मराठी माध्यमांच्या शाळांनी ''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' या कायद्याच्या अमंलबजावणीचा अभ्यास.

**कार्यात्मक व्याख्या :**

१ **''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९''** ६ ते १४ वयोगटातील बालकांसाठी हा कायदा देशभर (जम्मू आणि काश्मीर वगळून) दि. १ एप्रिल २०१० पासून लागू करण्यात आला.

२ **पुणे शहर :** पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील महानगर.

३ **मराठी माध्यमांच्या शाळा :** मराठी भाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळा.

४ **अमंलबजावणी :** शासनाच्या नियमावली अंतर्गत केलेला कायदा प्रभावीपणे राबविणे.

५ **अभ्यास:** ६ ते १४ वयोगटातील बालकांसाठी केलेल्या कायद्यांच्या अंमलबजावणीचे अध्ययन.

**संशोधनाची गरज:**

''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' ह्यामधील सर्व कायद्यांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. या कायद्यामुळे शिक्षण क्षेत्रातील परिवर्तन कसे झाले आहे हे पहाणे आवश्यक आहे. त्यावरून अमंलबजावणीच्या सद्य:स्थितीबाबत माहिती करून या सक्तीच्या कायद्यांचे परिणाम लक्षात घेणे गरजेचे आहे .

**संशोधनाची महत्त्व :**

१ विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट साध्य करताना ''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' हे कायदे महत्त्वाचे ठरतात.

२ या अधिनियमांची अमंलबजावणी करताना शाळांना येणाऱ्या अनुभवांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

३ या अधिनियमांच्या कायद्यांना विविध आव्हानांना सामोरे जाताना शालेय व्यवस्थापन समितीची मानसिकता व सामर्थ्य पाहणे आवश्यक आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१ मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये ''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' नुसार अमंलबजावणीचा अभ्यास करणे.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

२ या अधिनियमांची अमंलबजावणी करताना शाळांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.

३ या अधिनियमामुळे शालेय व्यवस्थापनातील परिवर्तनाचा आढावा घेणे.

४ बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्यासंदर्भात शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांना असलेली माहिती घेणे.

५ बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क २००९ नुसार झालेल्या बदलांची माहिती घेणे.

६ बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या कायद्यामध्ये उपाययोजना सुचविणे.

**गृहितके :**

१ शाळांना या कायद्याची अमंलबजावणी करताना अडचणी येतात.

२ अधिनियम २००९ या कायद्यांमुळे शिक्षण क्षेत्रात परिवर्तन झाले आहे.

३ अधिनियम २००९ या कायद्यांना शिक्षण क्षेत्रातील काही घटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आहे.

४ या कायद्याची अमंलबजावणी करताना शिक्षण क्षेत्रातील काही घटकांचा नकारार्थी दृष्टीकोन आहे.

**परिकल्पना :**

''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' या कायद्याची पुणे शहरातील मराठी माध्यमांच्या शाळांमधील अमंलबजावणीनुसार शाळांतील प्रगतीत लक्षणीय फरक पडतो.

**शून्य परिकल्पना :** ''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' या कायद्याची पुणे शहरातील मराठी माध्यमांच्या शाळांमधील अमंलबजावणीनुसार शाळांतील प्रगतीत सार्थ फरक पडत नाही.

**व्याप्ती, मर्यादा आणि परिमर्यादा :**

**व्याप्ती :** प्रस्तुत संशोधन हे पुणे शहरातील ५१ मराठी माध्यमांच्या शाळांशी आणि ''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' या कायद्यांची अमंलबजावणीचा अभ्यास याच्याशी संबंधित आहे.

**मर्यादा :** १ प्रस्तुत संशोधन हे पुणे शहरांतील ५१ शाळांपुरतेच मर्यादित आहे.

२ प्रस्तुत संशोधन हे पुणे शहरांतील निवडलेल्या ५१ शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांच्यापुरतेच मर्यादित आहेत.

३ प्रस्तुत संशोधन हे पुणे शहरातील मराठी माध्यमांच्या शाळेपुरतेच मर्यादित आहेत.

४ प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावली व मुलाखतींसाठी पुणे शहरांतील ५१ मराठी माध्यमांच्या शाळांमधील ५१ मुख्याध्यापक, १०० शिक्षक व ५१ पालकांपुरती मर्यादित आहे.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन हे सद्य:स्थिती अभ्यासल्याने **सर्वेक्षण पद्धतीचा** उपयोग केला आहे.

**नमुना निवड:**

प्रस्तुत संशोधनातील पुणे शहरातील मराठी माध्यमांच्या ५१ शाळांची निवड केली आहे.

१) मुख्याध्यापक : निवडलेल्या प्रत्येक शाळेतील ५१ मुख्याध्यापक

२) शिक्षक : निवडलेल्या प्रत्येक शाळेतील दोन शिक्षक याप्रमाणे एकूण १०० शिक्षक

३) पालक : निवडलेल्या शाळांपैकी ५१ पालक

**माहिती संकलन साधने :**

पुणे शहरातील मराठी माध्यमांच्या शाळांमधून मुख्याध्यापक, शिक्षक, पालक यांच्यातून माहिती गोळा करण्यासाठी खालीलप्रकारची साधने वापरण्यात येणार आहेत.

१. प्रश्नावली २. मुलाखत ३. क्षेत्रभेट

**संख्याशास्त्रीय साधने :**

१. शेकडेवारी २. आलेख

**मुख्याध्यापकांनी दिलेल्या लेखी प्रश्नावलीनुसार संकलित विश्लेषण :**

प्राप्त संकलित माहितीनुसार असे निदर्शनास आले की, बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ संदर्भातील मुख्याध्यापकांनी दिलेल्या माहितीनुसार ९४.१२% शाळांनी शाळाबाह्य बालकांचे सर्वेक्षण केले आहे, तेवढेच म्हणजे ९४.१२% प्रमाणात शाळेच्या कार्यक्षेत्रात वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेश दिला आहे. बालस्नेही शिक्षण मिळविण्यासाठी सुविधा उपलब्ध आहे. १००% प्रमाणात प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचा प्रवेश अधिनियमांप्रमाणे होतो, त्यामध्ये सर्वांना समान संधी, प्राथमिक शिक्षण पूर्तता प्रमाणपत्र मागणी केल्यास हस्तांतरण प्रमाण दिले जाते, तसेच बालकांची माहिती विहित नमुन्यात नोंदविण्यात आली आहे. शिक्षक-विद्यार्थी प्रमाणात आहे. ८६.२१% मुलांची १००% पटनोंदणी व उपस्थिती होते. ९८.०४% शाळांमधून भयमुक्त वातावरणात शारीरिक व मानसिक शिक्षा न देता विद्यार्थ्यांना समान संधी व समान वागणूक दिली जाते. ९६.०८% शाळांमधून बालकांना प्रवेश देताना कोणत्याही प्रकारची फी किंवा देणगी स्वरूपात घेतली जात नाही. ६८.६३% शाळेच्या माहिती फलकावर नागरिकांसाठी जाहिरपणे बालकांची नावे प्रत्येक सत्रापूर्वी प्रदर्शित केली जातात. ८४.३१% बालकांची चाळणी प्रक्रिया प्रवेशावेळी घेण्यात आली नाही. ९४.११% शाळांमध्ये शैक्षणिक वर्षा अखेरीतून संकलित मूल्यमापनाच्या किंवा इतर कारणांमुळे एखाद्या बालकास त्याच वर्गात ठेवण्यात आले नाही अशी माहिती संकलनाद्वारे मिळाली.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**मुख्याध्यापक मुलाखतः**

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ हा अधिनियम एप्रिल २०१० मध्ये लागू झाला. या अधिनियमाची अमंलबजावणी शासन नियमानुसार चालू आहे. मुख्याध्यपक नियमांची अमंलबजावणीसाठी प्रयत्नशील आहे. या अधिनियमांमुळे तळागाळातील व सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळवण्यासाठी शासन विविध सुविधा उपलब्ध करून देत आहे. विद्यार्थ्यांस येणाऱ्या सर्व अडचणींचा विचार करून विविध योजना राबवित आहे. बालकांना दर्जेदार व आनंददायी शिक्षण देऊन सर्वगुणसंपन्न बनविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहे. या अधिनियमांनुसार प्रत्येक बालकास शिक्षण देऊन त्याचा विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.

या अधिनियमांची अमंलबजावणी करताना काही शाळांमधून विविध समस्यांना सोडविण्यासाठी मुख्याध्यापकांना विविध प्रयत्न करावे लागतात. पालक अशिक्षित व आर्थिकदृष्ट्या मागासलेले असल्याने पटनोंदणी झाली तरी उपस्थितीबाबत उदासिन आहे. त्यांच्या कौटुंबिक समस्येमुळे ते मुलांच्या शिक्षणास अधिक महत्त्व देत नाही, तसेच काही शाळांमधून काही विद्यार्थ्यांस परिवहन व्यवस्था नसल्याने मुले उपस्थित रहात नाही. काही मुले आपल्या लहान भावंडास सांभाळण्यासाठी घरी राहतात. पालकांना समुपदेशन करूनही शिक्षणाचे महत्त्व जाणून घेत नाही, त्यासाठी शिक्षकांस सतत गृहभेटी द्याव्या लागतात.

शालेय शिस्त हा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे, त्यासाठी मुख्याध्यापक सतत प्रयत्न करतात. मुलांना विश्वासात घेऊन स्वयंशिस्त लावण्यासाठी प्रयत्न करतात व विद्यार्थ्यांमध्ये चांगला बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न करत आहे, परंतु पालकांना शाळा व्यवस्थापन समितीची आवश्यक ती माहिती नाही कारण बहुतेक पालकवर्ग अशिक्षित आहे. मुख्याध्यापकांना शालेय कामकाजाव्यतिरिक्त कामाचा बोजा अधिक असल्याचे काही मुख्याध्यापकांनी सांगितले. उदा. सर्व माहिती ऑनलाईन अपडेट् (Online Update) करणे म्हणजेच जिल्हा परिषद व केंद्र सरकारने सतत केलेल्या मागणीद्वारे माहिती भरताना सतत Server down होण्यामुळे वेळ अधिक लागतो. विविध शालेय अनुदान आल्यास बँक व्यवहार, त्यातील हिशोब ठेवणे, सतत माहिती पुरविणे. मध्यान्ह भोजनाबाबत मासिक रिपोर्ट, रोजच्या नोंदी ठेवणे. विविध शासकीय योजनांमध्ये सहभाग उदा. तंबाखू नियंत्रण समिती, इतर शासकीय पत्रव्यवहार, सतत शासकीय माहिती देत राहणे त्यामुळे विद्यार्थींबाबत केलेल्या नियोजनांची अंमलबजावणी करताना वेळ अपुरा पडतो, तसेच पटसंख्या कमी असणाऱ्या शाळेत क्लार्क व शिपाई उपलब्ध नसल्याने ती कामेसुध्दा मुख्याध्यापकांनाच करावी लागतात. शालेय दाखले, इतर कार्यालयीन कामे, शालेय साहित्य आणणे, वस्तूंची देखरेख, नोंदी करणे, इ. काम असल्याने महत्त्वाचे विद्यार्थी हा भाग केंद्रीत रहात नाही. कारण पटसंख्या कमी असणाऱ्या शाळेत ६ ते १४ वयोगटातील मुले लहान असतात, त्यासाठी सतत लक्ष देऊन त्या वर्गात मुख्याध्यापकांना अध्ययन अध्यापन करतानाच

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

इतरही महत्त्वाची कामे करण्यासाठी शिक्षकांची मदत घ्यावी लागते. त्यामुळे अंमलबजावणी करताना मुख्याध्यापकांस वेळ कमी पडतो. यामध्ये काही सामाजिक संस्था, प्राधिकरणातील नागरीक शाळेस भेटी देऊन विविध योजना राबविण्यास मदत करतात. शालेय साहित्य पुरवतात, समाजातील बऱ्याच संस्थांचे लक्ष शालेय विकासाकडे या अधिनियमांमुळे केंद्रीत झाले आहे. त्यामुळे शालेय विकासास मदत होत आहे.

**शिक्षकांनी दिलेल्या लेखी प्रश्नावलीनुसार संकलित विश्लेषण :**

माहिती संकलनाद्वारे शिक्षकांकडून बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ कायद्याची अंमलबजावणी करताना असे निदर्शनास आले की, १००% परिसरातील शाळाबाह्य मुलांचा शोध घेवून पटनोंदणी केली आहे. शिक्षक कार्यशाळा प्रशिक्षणात सहभाग घेतात, तसेच संकलित नोंदपत्रक अंतर्भूत असणारी नोंदवही (प्रत्येक बालकांसाठी) ठेवलेली आहे. पटनोंदणीनुसार उपस्थितीबाबत सर्व शिक्षक प्रयत्न करतात. अभ्यासक्रमाची अंमलबजावणीचे नियोजन करतात. बालकेंद्रीत व बालसुलभ पध्दतीने विद्यार्थ्यांना शिक्षण देतात. पालकसभेत पालकांशी सुसंवाद करून बालकाच्या प्रगतीत पालकांचे सहकार्य मिळवतात व बालकांची गळती रोखण्यासाठी विशेष प्रयत्न करतात. ९३% शाळेत कोणत्याही बालकाला शारिरीक किंवा मानसिक शिक्षा देण्यात आली नाही. ९५% शाळेत निकषानुसार इतर सर्व भौतिक साधने/ सुविधा उपलब्ध आहे. ९८% शाळांमधून प्रशिक्षित शिक्षक आहेत, तसेच तेवढ्याच प्रमाणात अप्रगत विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक शिक्षण/ मार्गदर्शन शिक्षक देतात. अध्ययन अध्यापनात उपक्रम, शोध व संशोधन या माध्यमांचा उपयोग करतात. ९९% शिक्षक हे अभ्यासक्रम नियोजनाप्रमाणे पूर्ण करतात. ९४% प्रमाणात शिक्षक बालकाला संपादणूक पातळीपर्यंत आणण्यासाठी परिषदेने तयार केलेली हस्तपुस्तिकेचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी करतात. अशा प्रकारे अंमलबजावणी संदर्भात माहिती निदर्शनास आली.

**शिक्षक मुलाखतः**

'बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९' हा बालकेंद्रीत अधिनियम कायदा आहे. बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणे, बालकांस चांगले मूल्य आधारीत शिक्षण हे अध्यापन करताना विविध साहित्य, उपक्रम, प्रकल्प, स्वाध्याय, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, इत्यादी द्वारे हसत-खेळत, आनंदाने द्यावयाचे शिक्षण आहे. शिक्षक यासाठी प्रयत्नशील आहे. शिक्षक सर्वेक्षण करून शाळाबाह्य मुले शाळेत आणतात, परंतु समकक्ष वर्गात प्रवेश दिल्यास व विशेष बालके वर्गात असल्यास शिक्षकांना अध्यापनास अडचणी निर्माण होतात. विशेष मुलांना अधिक वेळ द्यावा लागतो, त्यांच्या गतीने अध्यापन करावे लागते. इतर विद्यार्थ्यांचा अभ्यास नियोजनाप्रमाणे पूर्ण करण्यास अडचणी येतात. समकक्ष वर्गातील प्रवेशपात्र विद्यार्थी यांच्यातील न्यूनगंड व भिती दूर करण्यास विशेष प्रयत्न करावे लागतात. शिक्षक ते करतात, परंतु शिक्षकांना अध्यापनासाठी वेळ कमी मिळतो व त्यांना इतरही अशैक्षणिक कामेही असतात.

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

उदा. BLO – Booth Level Officer. कलम २५ व २७ नुसार शिक्षकांना मतदानाचे काम, जनगणनेचे काम असले तरी BLO हे सतत ५ ते ७ वर्षे काम शिक्षक करत आहेत. यामध्ये मतदार याद्या बनवणे, फोटो वाटप, मतदान जनजागृती यामुळे BLO ना कामांसाठी वेळ द्यावा लागतो. त्याचप्रमाणे मुलांचे आधारकार्डबाबत शिक्षकांना काम दिले आहे. पालक अशिक्षित असल्यामुळे शिक्षकांना सतत पाठपुरावा करावा लागतो, त्यात आधारकार्डबाबत अनेक अडचणी येतात यामध्ये मुलांचे जन्माचे दाखले, त्यांच्या बोटांचे ठसे उमटत नाही त्यामुळे शिक्षकांना मुलांना घेऊन बुथवर जावे लागते. काही शाळांमध्ये मुलांना बँक खाती उघडण्यासाठी शिक्षकांनाच घेऊन जावे लागते अशा विविध कामांमुळे अध्यापन करण्यास कमी वेळ मिळतो म्हणजेच या अधिनियमाच्या अमंलबजावणीनुसार विद्यार्थी केंद्रीत शिक्षण हा भाग बाजूलाच राहत आहे.

खाजगी शिकवणीबाबत काही शिक्षकांच्या मते गरज आहे तर काही शिक्षकांच्या मते गरज वाटत नाही असे समजते. काही शाळांमध्ये पटसंख्या अधिक आहे तर काही शाळांतील मुलांना व्यक्तीगत मार्गदर्शनाची गरज असते. त्यासाठी शिक्षक आपल्या अनुभवानुसार त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करू शकतात परंतु त्या शिक्षकांनी त्याचा व्यवसाय म्हणून वापर करू नये म्हणजेच विद्यार्थ्यांना किंवा पालकांना सक्ती करू नये. खाजगी शिकवणीत विविध शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षक मार्गदर्शन करू शकतात. शिक्षक अप्रगत विद्यार्थ्यांसाठी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम, विविध स्पर्धा, खेळ, बालसभा, वाचन-लेखन उपक्रम, गायन-नृत्य-वक्तृत्व स्पर्धा, विविध साहित्य हाताळण्यास दिले जाते अशा प्रकारे अधिकाधिक पूरक व अतिरिक्त मार्गदर्शन करून तसेच मागील वर्षीच्या इयत्तांमधील त्यांची क्षमता प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न केले जातात.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ या बालकेंद्रीत शिक्षणामुळे बालकांमध्ये चांगले बदल दिसून येतात. बालकांना आनंददायी व ज्ञान रचनावादी शिक्षणामुळे शाळेत येण्यास आनंद वाटतो. स्वयं अध्ययनाची सवय लागते, सृजनात्मक गुण वाढीस लागतात, अध्यापक व विद्यार्थी यांच्यामधील दरी कमी होताना दिसते, विद्यार्थी कोणत्याही दडपणाखाली शिक्षण घेत नाही तर मनमोकळेपणे व आनंदाने व सहजपणे अनौपचारिक पध्दतीने शिक्षणाचा आस्वाद घेतात. सर्व सुसज्ज सुविधा, तांत्रिक तंत्रज्ञान उपयोगी शिक्षण अधिक प्रभावी होत आहे. प्रत्येक विद्यार्थी शाळेत येण्यासाठी सामाजिक बांधिलकीतून विविध संस्था कार्यरत झाल्यामुळे समाजात शिक्षणाविषयी जागृती निर्माण होत आहे. एक प्रकारचे परिवर्तनशील शिक्षण विद्यार्थ्यांस मिळत आहे.

**पालकांच्या लेखी प्रश्नावलीनुसार संकलित विश्लेषणः**

प्राप्त संकलित माहितीनुसार बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ ची काही पालकांना माहिती नसल्याचे निदर्शनास आले. ६७% पालकांना या अधिनियमाची माहिती काही प्रमाणात आहे,

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

त्यातील ९४% पालक हे पालकसभेचे सभासद आहेत. पालकसभेस हजर राहून चर्चेत भाग घेतात, परंतु ७०% पालकांना शालेय व्यवस्थापन समितच्या कार्याची काही प्रमाणात माहिती आहे. सामाजिक बांधिलकीतून ९८% पालक शालेय प्रगतीसाठी अग्रेसर आहेत. विद्यार्थ्यांना गरजेनुसार अतिरिक्त पूरक शिक्षण व मार्गदर्शन ९५% प्रमाणात शिक्षक देत आहेत, त्यामुळे उपस्थित पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी माहिती मिळाली.

**पालक मुलाखतः**

पालकांना पालक म्हणून आपल्या पाल्याची काळजी आहेच, आपल्या पाल्याने शाळेत जावे, चांगले शिक्षण घ्यावे असे प्रत्येक पालकाला वाटते. त्यासाठी काही पालक प्रयत्न करत आहेत, ते पालक शाळेत नियमित जाऊन आपल्या पाल्याची माहिती घेत असतात, आहेत. तसेच काही पालक शालेय व्यवस्थापन समितीचे सभासदसुध्दा आहेत. परंतु सदस्य म्हणून आपल्या परिसरातील सर्व पालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल याची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे व शिक्षण हक्क अधिनियमाप्रमाणे आपली भूमिका काय आहे याचा बोध त्यांना स्पष्ट होत नाही. त्यामुळे शाळा व्यवस्थापन समिती संदर्भात त्यांच्या मनात अनेक प्रश्न उभे रहात आहेत. समितीची रचना, कर्तव्ये व जबाबदारी याची व्यवस्थित माहिती काही पालकांना अजिबात नाही. पालक हे पालकसभेस हजर राहून आपल्या पाल्याची शैक्षणिक प्रगतीविषयी, शाळेतील उपस्थिती तसेच इतर विद्यार्थ्यांशी वर्तणूक यासंबंधी आवश्यक ती माहिती शिक्षकांकडून घेत असतात

**सर्वसाधारण निष्कर्ष :**

१ बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ संदर्भात बहुतेक माहिती काही जणांना आहे.

२ शाळाबाह्य मुलांना शिक्षण प्रवाहात आणताना विविध अडचणी येतात.

३ समकक्ष वर्गात प्रवेश दिल्यास बालकांस अध्यापनास अडचणी येतात.

४ अध्यापन करताना शिक्षकांना वेळ व अभ्यासक्रमातील नियोजनात लवचिकता ठेवावी लागते.

५ विशेष बालकांना अध्यापन करताना इतर विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी नियोजन वेगळे करावे लागते.

६ अशैक्षणिक कामाचा परिणाम वर्ग कार्यावर होतो.

७ शाळा व्यवस्थापन समितीद्वारे राबविल्या जाणाऱ्या शालेय विकास योजनांची काहींना माहिती आहे.

८ १०० टक्के पटनोंदणी व उपस्थितीसाठी प्रयत्न करताना गृहभेटी व पालकांच्या, बालकांच्या समस्येचा परिणाम अध्यापनावर होतो.

Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

९ मुख्याध्यापकांना पालक, शिक्षक व बालक यांच्यातील दुवा म्हणून कार्य करताना विविध समस्या सोडविण्यात अधिक कार्य करावे लागते.

१० शालेय शिस्त व अप्रगत विद्यार्थ्यांसाठी काम करताना विविध उपक्रम सतत राबवावे लागतात.

**शिफारशीः**

१ १०० टक्के पटनोंदणी व उपस्थिती संदर्भात शाळांसोबत सामाजिक संस्थांचे अधिक सहकार्य घ्यावे

२ शाळाबाह्य मुलांसाठी प्रत्येक शाळांमधून पालकांना समुपदेशन व परिवहन व्यवस्था मिळावी.

३ सक्तीचे शिक्षण देण्यासाठी अधिक अटी पालकांना घालाव्यात.

४ विशेष बालकांसाठी शिक्षकांना प्रशिक्षण दिले जावे किंवा प्रत्येक शाळेत विशेष बालकांसाठी एक शिक्षक असावा.

५ समकक्ष वर्गात प्रवेश देताना प्रथम त्यास शाळापूर्व प्रशिक्षण द्यावे.

६ परिवर्तन करून शालेय शिस्तीसाठी समुपदेशनाचा तास नियोजनात असावा.

७ प्राथमिक शिक्षण पूर्तता प्रमाणपत्रासाठी पायाभूत चाचणी घेऊन प्रमाणपत्र द्यावे.

८ अशैक्षणिक काम :- आधारकार्ड काढणे, बँक खाती काढणे, इत्यादींसारख्या कामांचा शिक्षकांच्या अध्यापन नियोजनावर परिणाम होतो, अशा कामांसाठी एखाद्या कर्मचाऱ्याची नेमणूक करावी.

९ निवडणूका (कलम २५ व २७) नुसार शिक्षकांना जनगणना व निवडणुकांचे काम असले तरी BLO (Booth Level Officer) चे काम सतत सरासरी ५ वर्षे करावे लागत असल्यांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान अधिक होते, त्यामुळे या कामासाठी दुसरी पर्यायी व्यवस्था करावी.

१० प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक कलम राबवताना येणाऱ्या अडचणींचे संशोधन होणे आवश्यक आहे.

**पुढील संशोधनासाठी विषयः**

१ अध्यापनात शिक्षकांनी विशेष मुलांसाठी विविध अध्यापन पध्दतीचा वापर करावा.

२ प्राथमिक स्तरावर ''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' संदर्भात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास.

३ शालेय व्यवस्थापन समितीच्या कार्याचा अभ्यास.

४ शालाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठीचा अभ्यास

५ ''बालकांच्या मोफत सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९'' या अधिनियमांची अंमलबजावणी व परिणामकारकतेचा अभ्यास

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**संदर्भ सूची :**

*मुळे, रा. शं. आणि उमाठे, वि. तु. (१९९८) : 'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे', विद्या बुक्स, औरंगाबाद.*

*मुळे, रा. शं. आणि उमाठे वि. तु. (१९५६) : 'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मित, नागपूर.*

*भिंताडे, वि. रा. (२००४) : 'शैक्षणिक संशोधन पद्धती', नुतन प्रकाशन, पुणे.*

*डॉ. आगाशे, प्र. (२०१२) : 'शिक्षण स्वातंत्र्याची पहाट', उन्नती पब्लिशिंग हाऊस, पुणे.*

*कुलकर्णी, हे (२००७) : 'शाळा आहे, शिक्षण नाही', ग्रंथाली प्रकाशन, पुणे.*

*महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद (विद्यापरिषद) (२०१२) : 'मार्गदर्शिका', महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.*

*महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद (२०१०) : 'सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन-शिक्षक मार्गदर्शक', महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.*

*प्रा. डॉ. संजीव सोनवणे, प्रा. डॉ. शोभा कागदे, प्रा. डॉ. नेहा देव आणि प्रा. सौ. गौरी खैरे (२०१६) : 'शैक्षणिक संशोधन व संख्याशास्त्र', निराली प्रकाशन, पुणे.*

*डॉ. राजा पोखरापूरकर (१९९९) : 'संशोधनासाठी नमुना निवड', श्री प्रकाश वाणी, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.*

*डॉ. नेहा देव (२०१२): 'संशोधन विषयक लेखन आराखडा ते अहवाल', श्री प्रकाशन, पुणे.*

*Copyright © 2023, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*